गुण

त्यांनी तिजोरी महत्प्रयासाने उजेडात आणून ठेवली. पण तेव्हापासून अक्षरे जुळवताना ती जवळ उभे राहणारासही दिसू लागली. तेव्हा ती कुलपेही कुचकामाची ठरली. यापेक्षा अक्षर शत्रू कुलपे पुष्कळ बरी, असा टोला देत देत त्यांनी त्या कुलपाच्याऐवजी दुसऱ्या कुलपाची योजना केली. हे कुलूप नुसते दाबले की लागत असे. उघडताना मात्र त्याला किल्लीची जरूर लागे. एके दिवशी बंडूनाना आम्हांकडे हर्षित मुद्रेने येऊन म्हणू लागले, "आमच्या आर्यभूमीच्या पुत्रांना कल्पकता नाही म्हणून चोहोकडे ओरड चालू आहे. पण हा आरोप निव्वळ खोटा आहे. अहो, आम्हांला संधी मिळत नाही साधी! ती मिळती तर आम्हांमध्ये शेकडो एडिसन झाले असते." देशाभिमानाच्या या उकळीचा अर्थ विचारता बंडूनानांनी प्रथम आपली कोणत्याही प्रकारे स्तुती करणार नाही असे आम्हांपासून वचन घेतले. नंतर लोहाराच्या मदतीने त्यांनी स्वतः तयार केलेले एक कुलूप दाखवले. ते म्हणाले, 'या कुलपाची कल्पना मला आमच्या तिजोरीच्या कुलपावरून सुचली. या कुलपाचे गुणधर्म त्या कुलपाच्या अगदी विरुद्ध आहेत. त्या कुलपास उघडण्याला किल्ली पाहिजे–याला लावताना मात्र पाहिजे ते कुलूप नुसते दाबून लावता येते–माझे नुसत्या हिसड्यासरसे उघडते. हे कुलूप मी–आता तिजोरीला लावून पूर्वीचे काढून टाकणार."

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) काही कड्यांना आणि काही दारांना दोन–दोन कुलुपे का लावलेली होती ?

(ब) नानांनी लावलेले अक्षरी कुलूप कुचकामी का ठरले ?

(क) कुलूप लोहाराकडून काढायचे नाही असा बंडूनानांचा का हट्ट होता ?

(ड) नानांचे डोळे पांढरे होण्याची वेळ का आली ?

(इ) बंडूनानांनी लोहाराच्या मदतीने तयार केलेल्या कुलपाचे गुणधर्म कसे आहेत ?

२. गट "अ" मधील वाक्प्रचारांची गट "ब" मधील अर्थाशी समान जुळणी करा :— १०

| **"अ" गट** | **"ब" गट** |
|---|---|
| (अ) सोने होणे | (१) प्रभाव पाडणे |
| (ब) कुंडली मांडणे | (२) सार्थक होणे |
| (क) आभाळाला कवेत घेणे | (३) विनवणी करणे |
| (ड) छाप उमटवणे | (४) भविष्य वर्तवणे |
| (इ) पाय धरणे | (५) खूप कष्ट करणे |
| (फ) शहानिशा करणे | (६) त्याग करणे |
| (ग) दाद देणे | (७) साध्य करणे |
| (ह) पारा चढणे | (८) प्रशंसा करणे |
| (य) जिवाचे रान करणे | (९) खूप रागावणे |
| (र) तिलांजली देणे | (१०) खात्री करणे. |

३. पुढीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचा वाक्यात उपयोग करा :— १०

| | |
|---|---|
| (अ) आवड | (ब) स्वातंत्र्य |
| (क) वरदान | (ड) आनंद |
| (इ) निर्मिती | (फ) कठीण. |

गुण

४. पुढीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा :— २०

(अ) हिवाळ्यात युरोपमध्ये पक्ष्यांचे गायब होण्यामागचे रहस्य सुरुवातीच्या काळात कसे लक्षात आले ?

(ब) डॉ. राजन गवस यांनी सांगितलेली सखू आजीची शिक्षणाबाबतची जागरूकता स्पष्ट करा.

(क) लेखिका हेलन केअर यांची बालवयात 'धुक्यात सापडलेल्या जहाजासारखी अवस्था' का झाली असेल ? तुमच्या शब्दांत लिहा.

(ड) लेखक शंकरराव खरात सातारा जिल्ह्यातील औंधला जायच्या का विचारात होते ?

(इ) काझीरंगा अभयारण्याची भौगोलिक वैशिष्ट्ये सांगा.

(फ) एडिसनने बांबूपासून कार्बन तयार करण्याचा विचार का केला?

५. कोणत्याही एका पाठाच्या/कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही **चार**) :— १०

(अ) 'माझे शिक्षक व संस्कार' या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(१) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. या विधानाबाबत तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

(२) 'शाळा ही विद्यार्थ्यांवर संस्कार करणारे एक प्रमुख केंद्र असते' हे विधान स्पष्ट करा.

(३) शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नातेसंबंधाविषयी संकल्पना स्पष्ट करा.

(४) शाळेच्या 'बागा' लेखकांसारख्या मुलांच्या जिवावर का उभ्या होत्या ?

(५) लेखक सातारा जिल्ह्यातील औंधला जायच्या का विचारात होते ?

**किंवा**

(ब) 'उजाड उघडे माळरानही' या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(१) वसंतऋतूच्या आगमनाने सृष्टीत होणारे बदल तुमच्या निरीक्षणाने लिहा.

(२) 'उजाड उघडे माळरानही' या कवितेची मध्यवर्ती संकल्पना स्पष्ट करा.

(३) 'उजाड उघडे माळरानही' या कवितेतून कोणता संदेश मिळतो ?

(४) 'उजाड उघडे माळरानही' कवितेतील भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(५) सृष्टीचे सौंदर्य कायम राहण्यासाठी तुम्हाला सुचतील असे उपाय लिहा.

६. (अ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्दांचे मराठीतील पर्यायी शब्द लिहा :— ५

(१) **Destiny** (२) **Treasury**

(३) **Mess** (४) **Exhalation**

(५) **Ineffective** (६) **Shelter.**

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** संख्या अक्षरात लिहा :— ५

(१) ४३५० =

(२) ३०० + २० = ३२०

(३) ७०५ – ५ = ७००

(४) ६० × ४ = २४०

(५) ५२ ÷ १३ = ४

(६) ७०.६ =

[ उलटून पहा

गुण

(क) रिकाम्या जागी कंसातील शब्दांचे योग्य रूप घालून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतेही **दहा**) :– १०

(१) नियमितपणे रोज ………… जोडी येऊ लागली (पितापुत्र).

(२) लोखंडी रूळावरून इंग्रज आगीनगाडी चालवणार, ही ………… लोकांना मोठी अचंब्याची वाटली (कल्पना).

(३) ………… वैशिष्ट्य दाखवणारा दुसरा प्राणी म्हणजे एकशिंगी गेंडा (आसाम).

(४) पोहण्याच्या शर्यतीसाठी चार-पाच ………… बांधलेले असतात (तलाव).

(५) एडिसनने ………… उपयोग करून पाहिला (प्लेटिनम).

(६) सखू आजी सहज बोलायला लागली तरी एक ………… बोलायची (कविता).

(७) ………… कोणते कुलूप लावायचे याचा बंडूनानांना फार दिवस प्रश्न पडला होता (तिजोरी).

(८) पक्ष्यांच्या ………… अनेक प्रकार पाडता येतील (स्थलांतर).

(९) आईच्या गळ्यात ………… हात टाकावा तसे हे पूल (मूल).

(१०) एका छोट्या ………… मधमाश्यांचं पोळंही रचलं जाऊ लागलं (फांदी).

(११) ………… कुस्त्या करून मी कधी खोबरे, तर कधी नारळ, तर कधी एखाद्या रुपयापर्यंत इनामे मिळवली आहेत (हंगाम).

७. (अ) पुढीलपैकी कोणतेही **तीन** शब्द शुध्द करून लिहा :— ३

(१) इतीहास (२) समीति

(३) अमेरीका (४) सुर्यग्रहण.

(ब) पुढीलपैकी कोणत्याही **तीन** शब्दांचे वचन बदला :— ३

(१) चांदणी (२) दरवाजा

(३) पुस्तक (४) फूल.

(क) पुढीलपैकी कोणत्याही **तीन** शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :— ३

(१) ऊन (२) इकडे

(३) आवडते (४) उजेड.

(ड) कंसातील सूचनेप्रमाणे **एक** वाक्य बदलून लिहा :— १

(१) मी उगाचच बेचैन झालो आहे (काळ ओळखा).

(२) मन <u>ताजेतवाने</u> झाले की पुन्हा कामाला सुरुवात (अधोरेखित शब्दाची जात ओळखा).

---

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक ३ जुलै, २०२२

[**वेळ** : दुपारी २-१५ ते सायंकाळी ५-०० ]

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण — १००)**

---

**सूचना**.— (१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करू नये.

**गुण**

१. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा :— २०

(अ) मुली वाचवा, नाही तर...

(ब) वृध्दाश्रमांची गरज आहे काय ?

२. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर चर्चा करा :— २०

(अ) ' मातृभाषेतून शिक्षण आवश्यक आहे का ? ' या विषयावर चर्चा करा.

(ब) ' युध्द आणि जागतिक मंदी ' या विषयावर चर्चा करा.

३. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :— ३०

(अ) अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाविषयी शासकीय निर्णयाचे परिपत्रक तयार करा.

(ब) माध्यमिक शाळांमध्ये संगणक योजना राबविण्यासाठी मान्यता प्रस्ताव शिक्षण संचालकाकडे सादर करा.

(क) राज्यसेवा पूर्व परीक्षा-२०२२ च्या आयोजनाबाबत प्रसिद्धीपत्रक तयार करा.

४. पुढीलपैकी प्रत्येक गटातून कोणत्याही **पाच** संज्ञांचे मराठी पर्याय द्या :— १५

**' अ ' गट**

(अ) Sitology
(ब) General Order
(क) Encyclopaedia
(ड) Irresponsible
(इ) Copper Age
(फ) Lewdness.

**' ब ' गट**

(अ) Missile
(ब) Tolerance
(क) Poultry-farming
(ड) Vendor
(इ) Satisfactory
(फ) Wireless.

**' क ' गट**

(अ) Work order
(ब) Abrogation
(क) Probability
(ड) Beneficiary
(इ) Centralisation
(फ) Dairy development.

[ उलटून पहा

गुण

५. खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा :— १५

(अ) I spent two hours yesterday trying to fix that broken radio.

(ब) It took me a while to understand what she was trying to say.

(क) Language is one of the most important inventions of mankind.

(ड) Country life is very peaceful in comparison with city life.

(इ) In South America, there are many traces of Indian culture.

(फ) It makes no difference to me whether you are rich or poor.

---

CON 68

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा
## प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ३ जुलै, २०२२

[**वेळ :** सकाळी १०-३० ते दुपारी १-१५]

**(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण — १००)**

---

**सूचना.**— (१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करू नये.

**गुण**

१. पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :— १०

माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येता जाता ही माझी 'नाही ती भानगड' आहे, उगीच 'हात दाखवून अवलक्षण' आहे, 'पेललं नाही तेव्हा खाजगी झालं!' अशी वाक्ये माझ्या कानांवर येऊ लागली; पण मी कोणत्याही टीकेला भीक घालणार नव्हतो. 'एकशे एक्क्याऐंशी पौंड.' रात्रंदिवस ते कार्ड माझ्या डोळ्यांपुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहिजे, या विचाराने माझी झोप उडाली. झोप कमी झाली तर वजन उतरते या विचाराने मला त्याचेही काही वाटत नव्हते. मी पूर्वीसारखा गाढ झोपत नाही यावर धर्मपत्नीचा मात्र अजिबात विश्वास नव्हता. "घोरत तर असता रात्रभर!" अशासारखी दुरुत्तरे ती मला करत असे.

"दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा! अशी भीष्मप्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या आणि आनंदाची गोष्ट अशी, की वजन उतरवण्याच्या शास्त्रात पारंगत झालेले तज्ञ मला रोज डझनवारीने भेटू लागले. इतकेच काय, परंतु ज्या आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची अवहेलना केली होती, त्यांनीच मला 'डाएटचा' सल्ला दिला. उदाहरणार्थ — सोकाजी त्रिलोकेकर.

"तुला सांगतो मी पंत, 'डाएट' कर. बटाट्याचं नाव काढू नकोस."

"हो! 'म्हणजे कुठं राहाता? म्हणून विचारलं तर नुसतं 'चाळीत राहातो' म्हणा. 'बटाट्याची चाळ' म्हणू नका. वजन वाढेल! खीः खीः खीः!" जनोबा रेगे या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही. नेहमी तिरके बोलायचे म्हणजे काय!

पण सोकाजींनी त्याला परस्पर जामून टाकले. "ए इडिअट! सगळ्याच गोष्टींत जोक काय मारतोस नेमी? मी सांगतो तुला पंत-तू बटाटा सोड." मी काय काय सोडले असता माझे वजन घटेल याची यादी बटाट्यापासून झाली.

(अ) पंतांनी कोणती भीष्मप्रतिज्ञा केली?

(ब) कोणत्या विचाराने पंतांची झोप उडाली?

(क) पंतांच्या धर्मपत्नीचा कशावर अजिबात विश्वास नव्हता?

(ड) पंतांना ताटामध्ये काय दिसू लागले?

(इ) पंतांच्या वजन घटविण्याच्या यादीची सुरुवात कशापासून झाली?

[उलटून पहा

गुण

२. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा :— २०

(अ) दाजीसाहेब आपल्या भाषणात अब्दुलबद्दल काय बोलले ते 'चुडीवाला' या पाठाच्या आधारे लिहा.

(ब) रेखामावशी पर्यावरणास कशी मदत करत होती ते 'फूटप्रिन्टस' पाठाच्या आधारे लिहा.

(क) आपल्या शालेय शिक्षणातील अडचणींचे वर्णन लेखक डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी कसे केले आहे?

(ड) 'पाणी हेच जीवन!' हे विधान 'जगणं कॅक्टसचं' या स्थूलवाचनाच्या आधारे स्पष्ट करा.

(इ) 'आत्मचरित्र म्हणजे लेखकाचा आरसा' हे विधान 'रंग साहित्याचे' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

(फ) 'आंधळा मागतो एक डोळा व देव देतो दोन!' असे लेखक चंदू बोर्डे यांना का वाटते?

३. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दहा** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :— १०

(१) स्वानंदतृप्ती कोण देतो ?

(२) काशीनाथ नाडकर्णींनी पंतांना कोणती गोष्ट वर्ज्य करायला सांगितली ?

(३) नारायण सुर्वे यांनी चंद्राला कोणाची उपमा दिली आहे ?

(४) अब्दुलचे दुकान बंद असल्याने कोणाचा धंदा तेजीत चालणार होता ?

(५) अभिषेक सुमितच्या लॅपटॉपवर काय पाहत होता ?

(६) रेखामावशीने त्यांच्या झोपडीपुढे किती झाडे लावली होती ?

(७) धडाडत्या तोफांतून काय पुढे पडत आहे ?

(८) सुश्रुतला कथा आपले दुसरे नाव काय सांगते ?

(९) आत्मचरित्रात तटस्थपणे कशाचे कथन आढळते ?

(१०) वन मजूर अचानक का थबकला ?

(११) लेखकाची हायस्कूलची प्रवेश फी किती होती ?

(१२) निरंजन दुपारी कोठे जेवायला जायचा ?

(ब) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा (कोणतेही **दोन**) :— ५

(१) उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ।

(२) जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;

(३) मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्राच्या संगती
आभाळाच्या छत्राखाली, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग उद्याचे.

गुण

४. खालीलपैकी कोणत्याही **दहा** रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :— १०

(अ) तैसा धांवें माझिया काजा । अंकिला मी ………… तुझा ।।

(ब) अधःपातें निवती ………… । अन्नदान सकळांसी ।।

(क) तिचे बाळ कडाक्याच्या ………… कुडकुडत रडत होते.

(ड) आमच्या चाळीतल्या लोकांनी माझ्या उपासाची ………… केली होती.

(इ) खरंय, पोरांनो, आजकाल …………, सायकल वापरणं विसरुनच गेलोय आपण.

(फ) ………… पावडेकाकांचा डेटा ॲपमध्ये भरायला सुरू केला.

(ग) अखेर ………… हायस्कूलमध्ये मला प्रवेश मिळाला.

(ह) तुझ्या शौर्यगाथेपुढे, त्याची केवढीशी …………

(य) सुश्रुतच्या वर्गात ………… गावाला सहल नेण्याचे ठरले.

(र) ………… रंग विविध हे, भुलविती साऱ्या रसिकजना.

(ल) ………… पिल्लांच्या सुरक्षेबद्दल भलतीच दक्ष असते.

५. (अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :— १०

(१) दात घशात घालणे

(२) मनातील मळभ दूर होणे

(३) डोळा लागणे

(४) वचन देणे

(५) उदोउदो करणे

(६) जीव गलबलणे.

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे अर्थ लिहा :— ५

(१) दिवस (२) तेज

(३) बिकट (४) अवहेलना

(५) आजन्म (६) शालीन.

६. (अ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** रिकाम्या जागी योग्य ते नाम लिहा :— ५

(१) ………… या इसमाला काय म्हणावे हे मला कळत नाही.

(२) ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून मी ………… मध्ये इंजिनियर म्हणून जॉईन झालो.

(३) ………… चिठ्ठी मोठ्याने वाचली.

(४) आमचे मूळ गाव दक्षिण गोव्यातील …………

(५) तिथं एका तेंदूच्या झाडाखाली, बांबूमध्ये ………… बसला होता.

(६) पाहता पाहता या रोपांवर भरगच्च ………… फुलतात.

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा :— ५

(१) खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या <u>कृष्णा नदीच्या</u> चिंचोळ्या प्रवाहावर होत्या.

(२) प्रत्येकीला प्रथम <u>बांगड्या</u> भरायच्या होत्या.

(३) एके दिवशी शाळेत त्यांनी एक <u>प्रयोग</u> करून दाखवला.

(४) वाळवंटी प्रदेश म्हणजे ठणठणीत कोरडेपणा, पाण्याचे दुर्भिक्ष आणि रेताड <u>जमीन</u>.

(५) कॅक्टस हे अमेरिका खंडातले <u>झाड</u> आहे.

(६) आकाशात अष्टमीचा <u>चंद्र</u> हसत होता.

गुण

(क) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** नामांची वचने बदला :— ५

(१) घर (२) फळ

(३) जिल्हा (४) थवा

(५) धबधबा (६) नकाशा.

(ड) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांपासून नामे बनवा :— ५

(१) प्राथमिक (२) सार्वभौमिक

(३) व्यावहारिक (४) धर्म

(५) व्यावसायिक (६) प्रामाणिक.

(इ) पुढीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांच्या संधी सोडवा :— ५

(१) महर्षि (२) सूर्यास्त

(३) प्रीत्यर्थ (४) इत्यादी

(५) जगन्नाथ (६) निस्तेज.

(फ) कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे बदल करून कोणतीही **पाच** वाक्ये पुन्हा लिहा :— ५

(१) मि चौफेर पाहिलं ; पण मला तरी काहि दिसलं नाही.
(वाक्य शुद्ध करून लिहा.)

(२) पहिला उपाय म्हणून मी आहारपरिवर्तन सुरू केले.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखून लिहा.)

(३) हे सांगायला ॲपची काय गरज आहे?
(वाक्याचा प्रकार ओळखा.)

(४) इथले शिक्षक मात्र मनानं खूप श्रीमंत होते.
(कर्त्याचे लिंग बदल करा.)

(५) या साऱ्यांचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे..
(अधोरेखित शब्दाचा अव्यय ओळखा.)

(६) भावे सरांनी शाळेत एक प्रयोग करून दाखविला.
(काळ ओळखा.)

CON 69

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक ३ जुलै, २०२२

[**वेळ** : दुपारी २-१५ ते सायंकाळी ४-४५]

(**एकूण गुण** — १००)

---

**सूचना**.— (१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करू नये.

गुण

१. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा :— २०

(अ) वर्तमानपत्राचे दैनंदिन जीवनातील स्थान.

(ब) आजचा संसारी माणूस.

२. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर चर्चा करा :— २०

(अ) ‘ गावातील तंटामुक्ती ’ याविषयी चर्चा करा.

(ब) मोबाईल धोकादायक आहे काय ? याविषयी चर्चा करा.

३. खालीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :— ३०

(अ) वनमहोत्सवात करायच्या कार्यक्रमांची टिप्पणी व पत्राचे प्रारूप ‘ युवक परिषदे ’ चा सचिव या नात्याने तयार करा.

(ब) तुमच्या भागातील पदपथावर फेरीवाल्यांचे आक्रमण झाल्याने पदपथावरून चालणे अशक्य झाले आहे त्या संदर्भात महानगरपालिका आयुक्तांना विनंतीपत्र लिहा.

(क) उन्हाळ्याच्या सुट्टीत बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी काही प्रकल्प राबवता येतील का, याबाबत शिक्षणमंत्र्यांपुढे काही योजना ठेवणारे विनंतीपत्र लिहा.

(ड) जिल्हा परिषद शाळांमधील विजेचा अपव्यय टाळण्यासाठी उपाय योजनांचे मार्गदर्शन करणारे परिपत्रक तयार करा.

४. खालीलपैकी कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्द प्रयोगांसाठी मराठी पर्याय द्या :— ५

(अ) Applied chemistry — (ब) Disorderliness

(क) Employment tax — (ड) Glassware

(इ) Insecurity — (फ) Missile.

[उलटून पहा

गुण

५. खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा :— १०

(अ) The human race has one really effective weapon and that is laughter.

(ब) A Money Bill shall not be introduced in a Legislative Council.

(क) The chairman of the Union Public Service Commission shall be ineligible for further employment .

(ड) It's easier to learn a new language when you are young.

(इ) The House or each House of the Legislature of a State shall have a separate secretarial staff.

(फ) Every person has some or the other ambition in life.

६. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :— १५

Our life today has become very fast and busy. Due to this we get tired both physically and mentally. We need some or the other kind of entertainment to relax our mind and body. We feel energetic when we are happy. Science has provided us with many means of entertainment. Cinema is one of them. Movies were invented by an American scientist Thomas Alva Edison in 1984. Initially, movies used to be silent. Another Scientist Dadste introduced the technique of adding sound to the movies. Movies travelled to India from England *via* America. The first Indian movie was made by Shri Dadasaheb Phalke in 1913. The first silent movie of India was 'Raja Harishchandra'. 'Aalmara' was the first talkie movie made in Mumbai. Today, India ranks second after Hollywood in the business of movie marketing.

In olden days, movies were black and white but now they are multi-coloured. We can watch movies on TV also. Initially movies were based on religious and cultural themes. Slowly the trend changed and now cinemas based on various social and economic issues made.